**<u>अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. –०१</u>**

**<u>फौ.कि.अर्ज क्र.४८६/२०२२</u>**
**दिक्षा विरुध्द स्नेहल**
**निशाणी – १९**

**<u>शपथेवर उलटतपासणी सुरु गैरअर्जदार द्वारे वकील श्री. भोयर यांच्या मार्फत</u>**

**१५.** हे म्हणणे खरे आहे की मी माझे गैरअर्जदार सोबत ठरवून झालेला विवाह आहे. हे म्हणणे खरे आहे की मला पाहिला आल्यानंतर दोन ते अडीच महिन्याने आमचे लग्न झाले. गैरअर्जदार कडून विशिष्ट वस्तूची मागणी करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदारच्या घरी माझ्या सोबत गैरअर्जदार क्र.१ व ३ राहत होते व गैरअर्जदार क्र.२ त्यांच्या कामाच्या ठिकाणी राहत होते. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार क्र.४ व ५ हे मौजा आमगाव येथे त्यांच्या घरी राहतात. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ नौकरी वर नसल्यामुळे आमच्या मध्ये वाद होत असे. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार क्र.१ चे बी.ई सिव्हील आहे. हे म्हणणे खरे नाही की लग्नाच्या वेळेस गैरअर्जदार क्र.१ नौकरी करीत नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगते की गैरअर्जदार क्र.१ नौकरी कोठे करीत होता याची माहिती नाही. निशाणी १ मधील नमूद घटना मी सांगितल्या प्रमाणे संरक्षण अधिकारी यांनी लिहल्या आहेत. आता मला निशाणी २३ अनुक्रमांक १ कडील तोंडी रिपोर्ट दाखविण्यात आली. सदर तोंडी रिपोर्ट मी गैरअर्जदार क्र.१ विरुध्द दिनांक ०९/०९/२०२२ रोजी दिली होती. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला ओळखीकरीता **<u>निशाणी २५</u>** देण्यात येते. प्रतिज्ञापत्र परिच्छेद क्र.३ मधील हिंसाचाराच्या घटनेची माहिती मी संरक्षण अधिकारी यांच्या कडे तक्रार देतांना सांगितली होती. परंतु तसे निशाणी १ मध्ये त्यांनी का नमूद केले नाही याचे कारण मी सांगू शकते. कारण संरक्षण अधिकारी यांनी मी सांगितलेल्या घटनापैकी काही घटना लिहून घेतल्या व काही लिहून घेतल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदारांना फसविण्यासाठी मी प्रतिज्ञापत्र परिच्छेद क्र.३ मधील घटना नमूद केली आहे.

**१६.** प्रतिज्ञापत्र परिच्छेद क्र.४, ५, ६ व ९ मधील हिंसाचाराच्या घटनेची माहिती मी संरक्षण अधिकारी यांच्या कडे तक्रार देतांना सांगितली होती. परंतु तसे निशाणी १ मध्ये त्यांनी का नमूद केले नाही याचे कारण मी सांगू शकते. कारण संरक्षण अधिकारी यांनी मी सांगितलेल्या घटनापैकी काही घटना लिहून घेतल्या व काही लिहून घेतल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदारांना फसविण्यासाठी मी प्रतिज्ञापत्र परिच्छेद क्र.४,५, ६ व ९ मधील घटना नमूद केल्या आहेत व त्या खोटया आहेत.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०८/०८/२०२२ रोजी मी गैरअर्जदार क्र.१ कडे घटस्फोटाची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की आपसी समझौत्याने घटस्फोटाचा लेख लिहण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या आपसी समझौत्याची एक प्रत मला देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांना रुपये १०० च्या स्टॅम्प वर आपसी समझौता झाला होता हे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी त्या स्टॅम्प ची मला मागणी केली होती. आता मला कागदयादी निशाणी २३ अनुक्रमांक २ कडील सुचनापत्राची छायाकिंत प्रत दाखविण्यात आली. सदरचे सुचनापत्र मला दिनांक ०१/०२/२०२३ रोजी देण्यात आले होते. त्यावर माझी सही आहे. त्याला

ओळखीकरीता **निशाणी २६** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०८/०८/२०२२ रोजी घटस्फोटाची मागणी केल्यानंतर माझ्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र.१ ने मला माहेरी सोडले होते. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी माझ्या कडे रुपये पाच लाखाची मागणी केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.२ ते ५ यांनी मारपीट करुन सोन्याचे दागिने काढून टाकल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/०८/२०२२ रोजी रात्री मला घरातून हाकलून दिले व कोणत्याही प्रकारची मदत न केल्याची मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ कडे १० एकर शेती आहे व त्यामधून त्याला वर्षाला रुपये पाच लाखाचे उत्पन्न मिळते, तसेच त्याच्या कडे दोन मकाने आहेत हे मी खोटे सांगत आहे. मला दरमहा रुपये १५,०००/– इतका खर्च लागतो याकरीता मी कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी माझेसोबत कोणताही कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०८/०८/२०२२ रोजीच्या आपसी समझौत्यामध्ये मला कोणतीही रक्कम मिळाली नाही म्हणून मी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

**स्वाक्षरी/–**
( अमित अ. कुळकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१, कामठी

कामठी
दिनांक २२/०२/२०२४